## शरद जोशी संकल्पित

# ‘भारत’उत्थान कार्यक्रम





# शरद जोशी आणि मार्शल प्लॅन

वेगवेगळ्या प्रसंगी लोकांच्या गाठीभेटी घेत असताना माझ्या एक गोष्ट लक्षात आली की सर्वदूर अशी समजूत करून घेण्यात आली आहे की मी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस साहेब यांना 'मार्शल प्लॅन' नावाची शेतकऱ्यांच्या समुच्च उद्धाराची काही एक योजना सादर केली आहे. ही गोष्ट अत्यंत दिशाभूल करणारी आहे.

मी, फक्त हिंदुस्थानातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची परिस्थिती दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपियन समूहातील दोस्त राष्ट्रांची जी परिस्थिती झाली होती तिच्याशी तुलना करून ती राष्ट्रे जशी पूर्णतः विनाशाकडे गेली होती तसेच आपले शेतकरीही संपूर्णतः विनाशाप्रत गेले आहेत हे लक्षात घेता किरकोळ आणि जुजबी उपायांनी काही जमणार नाही, याकरिता अमेरिकेने दोस्त राष्ट्रांच्या उत्थानाकरिता जसा 'मार्शल प्लॅन' आखला त्या धर्तीवर काहीतरी व्यापक योजना घ्यायला पाहिजे अशी कल्पना फक्त मुख्यमंत्र्यांना सुचवली.

त्याची अंमलबजावणी कशी करायची याची काही रूपरेखा मी मुख्यमंत्र्यांसमोर ठेवली. त्यात शेतकऱ्यांची वीजबिलांसह संपूर्ण कर्ज मुक्ती, किमान ३ लाख कोटी रुपयांचे भांडवल उपलब्ध करणे, शेतीमालावरील सर्व नियंत्रणे हटवून शेतीमालाची व शेतीनिविष्ठांची बाजारपेठ खुली करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास मुभा असणे, उपयुक्त व कार्यक्षम संरचना स्थापित करणे अशा काही मुद्द्यांचा, जे मी वेळोवेळी वर्तमानपत्रांच्या व दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या प्रतिनिधींसमोरही मांडले आहेत, समावेश आहे.

आता त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे काम अर्थातच त्यांना करायचे आहे.

- **शरद जोशी,** १७ सप्टेंबर २०१५

# भारत उत्थान कार्यक्रम

## उद्ध्वस्त शेतीच्या पुनर्वसनासाठी

## शरद जोशी संकल्पीत मार्शल प्लॅन

**लेखन व संपादन**
डॉ. शाम अष्टेकर, श्री. गोविंद जोशी, श्री. अजित नरदे,
श्री. अनंत देशपांडे, श्रीमती सरोज काशीकर

**भारत उत्थान कार्यक्रम**

उद्ध्वस्त शेतीच्या पुनर्वसनासाठी

शरद जोशी संकल्पीत मार्शल प्लॅन

**देणगी मूल्य : १० रू.**

**प्रकाशनः** शेगाव १२ डिसेंबर २०१७
शेतकरी संघटना मेळावा

**शेतकरी संघटना ट्रस्ट/न्यास द्वारा प्रकाशित**
सार्वजनिक न्यास क्र. ६९६६ (पुणे)
अंगारमळा, आंबेठाण, ता. राजगुरुनगर, जि. पुणे ४१०५०१
वेबसाईट: www.sharadjoshi.in

श्री. रवी काशीकर (अध्यक्ष)
श्री. गोविंद जोशी (कार्याध्यक्ष), शास्त्रीनगर, सेलू, जि. परभणी
भ्रमणध्वनीः 9422175461, ई-मेलः govindjoshi4@gmail.com

**अन्य ट्रस्टी-**
श्री. सुरेशचंद्र म्हात्रे, श्री अनंत देशपांडे, श्री. बद्रीनाथ देवकर, श्री. वामनराव चटप,
श्री. संजय पानसे, सौ. अलका दिवाण, श्री. रामचंद्रबापू पाटील, डॉ. मानवेंद्र काचोळे

श्री. अनिल घनवट, अध्यक्ष, शेतकरी संघटना

**लेखन व संपादनः**
डॉ. शाम अष्टेकर,
श्री. गोविंद जोशी,
श्री. अजित नरदे,
श्री. अनंत देशपांडे,
श्रीमती सरोज काशीकर

**मुखपृष्ठ**
श्री. ज्ञानेश बेलेकर

**चित्रे**
श्रीमती आभा जोशी

**मुद्रण**
**अनेकांत प्रकाशन,** जयसिंगपूर, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


**भाग-१.**

| | |
|---|---|
| पूर्वपीठिका | ४ |
| शेतकरी आणि 'भारताची' दारूण परिस्थिती | ५ |
| भारत-उत्थान कार्यक्रम: उद्दिष्टे | ५ |
| 'भारत' उत्थान कार्यक्रम-सूत्रे | ६ |

**भाग-२.**

| | | |
|---|---|---|
| १. | शेतकऱ्यांचे घटते उत्पन्न कसे सावरावे ! | ८ |
| २. | शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी | ८ |
| ३. | पतपुरवठा | ९ |
| ४. | पशुधन बाजाराची कोंडी | १० |
| ५. | वन्य पशु हत्या-निर्बंध | १० |
| ६. | वीज-बिल बाकी आणि कर्ज वसुली | १० |
| ७. | पीक विमाः अव्यवहार्य आणि दिखाऊ | ११ |
| ८. | बाजार समिती: केवळ एक स्पर्धक असावी | ११ |
| ९. | हमी-भाव व सरकारी खरेदी: एक मृगजळ | ११ |
| १०. | केवळ उत्पादन नव्हे, तर उत्पन्न वाढण्याची गरज | १२ |
| ११. | शेतजमिनीचे तुकडे न परवडणारे | १३ |
| १२. | जाचक समाजवादी भू-वापर कायदे रद्द करणे | १४ |
| १३. | भूमी-अभिलेखांचे आधुनिकीकरण | १४ |
| १४. | कौशल्य प्रशिक्षण | १५ |
| १५. | संरचना-रस्ते व रेल्वे वाहतूक | १५ |
| १६. | संरचना : पाणी आणि सिंचन | १५ |
| १७. | वीज पुरवठा आणि सौर वीज | १६ |
| १८. | संरचनेसाठी सरकारी व खाजगी गुंतवणूक | १६ |
| १९. | किरकोळ विक्रीत परदेशी गुंतवणूक | १७ |
| २०. | आच्छादित शेती | १७ |
| २१. | शेतमाल प्रक्रिया उद्योग | १७ |
| २२. | कृषी-कल्याण ऐवजी कृषी-व्यवसाय मंत्रालय | १८ |
| २३. | अन्न महामंडळ बरखास्त करा | १८ |
| २४. | शेतीवर आयकर | १९ |
| २५. | शेती-व्यवसाय धोरण | १९ |

**भाग-३.**

| | |
|---|---|
| शरद जोशी यांची काही विचारसूत्रे | २१ |
| स्वामिनाथन अहवाल - डॉ. शाम अष्टेकर | २४ |
| उस दर - श्री. अजित नरदे | २८ |

## १. पूर्वपीठिका

१२ डिसेंबर २०१५ ला शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी यांचे निधन झाले. या आधी १९७९ पासून शेतकरी प्रश्नावर चाकण येथे सुरु केलेली छोटीशी चळवळ देशभर पोचली. या चळवळीतून शेती शोषणाचा लेखाजोखा त्यांनी समर्थपणे मांडला. 'इंडिया आणि भारत' हे आर्थिकदृष्ट्या दोन वेगळे देश आहेत अशी मांडणी त्यांनी केली. 'शेतीमालाला रास्त भाव या एककलमी कार्यक्रमासाठी' चाललेली ही चळवळ १९९२ च्या आर्थिक सुधारणांनंतर 'आर्थिक खुलीकरणाशी' येऊन भिडली. मात्र शेतीसाठी खुलीकरण व स्वातंत्र्य आलेच नाही.

वातावरण बदल, पूर दुष्काळ आदि अस्मानी संकटांबरोबर सुलतानी संकटे वाढत गेली. शेतीचे अधिक तुकडे, न फिटणारी कर्जे, थकीत वीजबिले, जाचक सरकारी बंधने होतेच. शिवाय शहरी पक्ष व संघटना 'भाववाढीबद्दल' पूर्वीपासून विरोधी व आक्रमक होत्याच. जोशींच्या हयातीत शक्य ते सर्व प्रयत्न करूनही शरद म्हणजे २०१४ पर्यंत शेतकरी आत्महत्यात वाढ होऊन शेती-समस्या इतकी जटील झाली की शरद जोशी यांना भारतीय शेतकरी लढाई हरतोय अशी खात्री झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर विजयी राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांच्या पुनर्वसनासाठी 'मार्शल प्लॅन' नामक आर्थिक मदतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. या मार्शल प्लॅनमुळे पराभूत उध्वस्त राष्ट्रांतून तिसऱ्या महायुद्धाची बीजारोपण होण्याची शक्यता समंजस मार्शल प्लॅनमुळे टळली. याच धर्तीवर वाढत्या शेतकरी आत्महत्या उध्वस्त शेती अर्थव्यवस्थेमुळेच होत आहेत. 'पराजित व शोषित भारतासाठी' नवा आर्थिक कार्यक्रम नसेल तर ग्रामीण भारतच नव्हे तर संपूर्ण देशच आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या महासंकटात सापडेल अशी त्यांना भीती वाटत होती. आपल्या सहकाऱ्यांबरोबर अशा योजनेची ते चर्चा करीत होते. या काळात ते अत्यंत आजारी होते, तरीही इमेलवर त्यांनी एक टिपण पाठवले होते. या आधारे आम्ही 'भारत उत्थान कार्यक्रम' ही पुस्तिका तयार केली आहे.

मार्शल प्लॅनची संकल्पना शरद जोशींची असली तरीही प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचेकडून हे काम पुर्ण होऊ शकले नाही. आ. शरद जोशींच्या कल्पनेतील मार्शल प्लॅन मधील तपशील आम्ही तयार केले आहेत. ते आदर्श आणि अंतीम नाहीत. यानंतरही आलेल्या सुचनांचा विचार करून 'मार्शल प्लॅन' दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणेस संपादक मंडळ बांधील आहे.

## २. शेतकरी आणि 'भारताची' दारूण परिस्थिती

ब्रिटीश राजवटीत होणारे शेतकऱ्यांचे शोषण स्वातंत्र्यानंतरही गरिबांना जीवनावश्यक वस्तू कमी दरात मिळावे म्हणून चालूच राहिले.

हरित क्रांतीने धान्य-उत्पादन वाढले, देशाची वाढती भूक भागून आयात बंद झाली, निर्यात सुरु झाली, देश धान्याबाबत स्वतंत्र-स्वावलंबी झाला. तरीपण शेतीमालाच्या किमती कमी राखण्याचे जाणीवपूर्वक धोरण जारी असल्याने शेतकरी नागवला गेला. शेतकरी दरिद्री राहिला, इंडियावादी धोरण चालूच राहिले. सरकारी आकडेवारीनुसार शेतकऱ्यांच्यावर ७२ टक्के उणे सबसिडी किंवा 'अप्रत्यक्ष कर' लादला गेला. शेतीतले भांडवल संपले, कर्जे वाढली. देशाला पोसणारे शेतकरी हजारोंनी आत्महत्या करू लागले. देशाात २१ व्या शतकाचे वैभव एकीकडे चमकू लागले तर दुसरीकडे शेतकऱ्याचा गळफास आवळत चालला.

मोठ्या प्रमाणात आर्थिक विस्थापन, स्थलांतर सुरु झाले, शेतकरी-शेतमजूर शहरातल्या झोपडपट्टीत जगण्याचा पर्याय 'उत्तम' समजू लागले. विस्थापित 'भारत' इंडियातल्या झोपडपट्टीत पसरला, मोलमजुरी, धुणीभांडी हेच त्याचे नशीब झाले.

समाजवादी धोरणांनी जर्जर झालेली शेती 'अन्नसुरक्षा' 'मनरेगा' आदी भीकवादी कार्यक्रमांनी आणखी कठीण झाली.

भारतातल्या तुकड्या-तुकड्याच्या शेतीवर आता एवढी कुटुंबे जगू शकणार नाहीत. कोणताही देश आता केवळ शेतीवर प्रगत होऊ शकत नाही. भारतात ७०% कुटुंबाना शेतीच्या तुकड्यावर जगण्याची किंवा विस्थापित होण्याची सक्ती निर्माण झाली, कारण शेतीतून फायदा व भांडवलनिर्मिती कधीच थांबली होती. इथेच गरिबीचा उगम होता व आहे. आता गरज आहे एका सर्वंकष आर्थिक-राजकीय कार्यक्रमाची!

## ३. भारत उत्थान कार्यक्रम : उद्दिष्टे

शेती किफायतशीर झाली पाहिजे. आत्महत्या थांबल्या पाहिजेत. ज्याला शेती करायची आहे त्याला नीटपणे करु द्या. ज्याला ती सोडायची आहे त्याला नियोजनबद्ध रितीने शेती सोडून चांगले पर्याय शोधू द्या.

शेतकऱ्याला आज दुय्यम नागरिक म्हणून जगावे-मरावे लागते, त्याला इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने जगता आले पाहिजे.

त्यासाठी शेतकरी 'स्वतंत्र' झाला पाहिजे. यासाठी त्याच्यावरची व्यावसायिक व मालमत्ताविषयक बंधने उठली पाहिजेत.

## ४. 'भारत' उत्थान कार्यक्रम-सूत्रे

शेती अर्थव्यवस्था सुधारल्याशिवाय गरिबी हटणार नाही. याउलट शेतीचे शोषण करूनच इंडियाची आर्थिक विकासात विकृती निर्माण झाली आहे.

सद्यस्थितीत सर्व शेतीविषयक कर्जे अनैतिक व बेकायदेशीर असून शेतकरी सरकारचे काही देणे लागत नाही. शासकीय धोरणातून शेती व शेतकऱ्यांचे शोषण व नुकसान झाले असून सरकारकडेच शेतकऱ्यांचे येणे आहे. सबब शेतीला व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती मिळाली पाहिजे. अटी-शर्ती व निकष लावून अंशतः कर्जमाफीने प्रश्न सुटणार नाही. याचबरोबर थकीत वीज-बिले रद्द झाली पाहिजेत.

शेतीवरची विविध समाजवादी बंधने काढल्याशिवाय शेती किफायतशीर व स्पर्धात्मक होऊ शकत नाही. यासाठी मालमत्तेचा घटनात्मक मुलभूत हक्क पुनःप्रस्थापित करणे आवश्यक आहे. भारतीय शेती व शेतकरी चार प्रमुख कायद्यांचे बळी ठरले आहेत. हे कायदे म्हणजे:

(अ) **आवश्यक वस्तू नियंत्रण कायदा :** हा ब्रिटीशकालीन कायदा होता, १९५५ मध्ये तो दुरुस्त करून अधिक शेतकरी घातक केला गेला.

(ब) **जमीनविषयक निर्बंध :** जमीन धारणा, हस्तांतर, कमाल जमीन धारणा व कुळकायदा

(क) **जमीन अधिग्रहण व भरपाई कायदा**

(ड) **परदेशी व्यापार / आयात-निर्यात नियंत्रण कायदा**

भारतीय घटनेत मालमत्ता स्वातंत्र्य काढून घेण्यासाठी परिशिष्ट-९ तयार करून शेतीविषयक कायदे त्यात घातले. ज्यामुळे या कायद्यांना न्यायालयात आव्हान देणे अवघड झाले पण आता अशक्य नाही हे कायदे रद्द किंवा निष्प्रभ करणे हे महत्वाचे सूत्र असेल.

शेती-व्यवसाय सक्षम व स्पर्धात्मक होण्यासाठी विविध संरचना म्हणजे रस्ते, रेल्वे, बंदरे, पाणी, वीज, वाहतूक, बाजार-पणन, प्रयोगशाळा, शीतगृहे व साठवणूक प्रक्रिया व आता माहिती-तंत्रज्ञान- लागतात. ही संरचना निर्माण करणे, विस्तारणे आणि सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. यासाठी सरकारी आणि खाजगी/परदेशी गुंतवणूक आवश्यक आहे. सरकारी गुंतवणुकीसाठी रोख्याद्वारे 'भारत'निधी उभारणे अनिवार्य आहे.

शेतीवरची सर्व बंधने काढून शेतजमीन आणि शेतमाल बाजार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पूर्णपणे खुला करावा. इतर व्यावसायिकांप्रमाणे शेतकऱ्यांची सौदाशक्ती वाढवणे आवश्यक आहे.

जनुक बदल पिकांसह सर्व शेतीविषयक तंत्रज्ञान खुले करावे.

भारतीय शेतीवर लोकसंख्येचा जादा भार आहे, तो लोकशाही व खुल्या आर्थिक

उपायांनी कमी करणे व व्यवसाय-बदलासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे आवश्यक आहे.

शेती-व्यवसायात बाहेरील भांडवल येण्याचा मार्ग मोकळा व्हावा यासाठी खाजगी, सहकारी, कंपन्या आदि बहुविध प्रकारे शेती करण्यासाठी अनुकूल आर्थिक-पर्यावरण लागेल. त्यासाठी जमीन-धारणा, हस्तांतरण आदि कायदे रद्दबातल करणे ही पूर्वअट आहे.

शेतकरी व शेतीवर काम करणाऱ्या कुटुंबाना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून ग्राहक म्हणून बाजारात उतरु दिले तरच रोजगार निर्माण होतील व औद्योगिक विकास साध्य होईल.

भाग - २

# शरद जोशी संकल्पीत 'भारत उत्थान कार्यक्रम'

## १. शेतकऱ्यांचे घटते उत्पन्न कसे सावरावे !

भारतीय शेतकरी बाजार-स्पर्धात्मक शेतीतूनच उपन्न मिळवू शकेल. जागतिक व्यापार विषयक कराराचे पालन करावे आणि इतर देशांनाहि असे पालन करायला भाग पाडावे. यासाठी :

सर्व शेतमालावरील निर्यात बंधने ताबडतोब उठवावीत.

टप्प्याटप्प्याने शेतमाल आयात बंधने देखील उठवावीत.

आवश्यक वस्तू कायदा (१९५५) वापरून भाववाढ, साठेबाजी भिती दाखवून कारणे देऊन अंतर्गत शेतमाल बाजारभाव पाडण्याचे कुटील कारस्थान बंद केले पाहिजे, यासाठी हा कायदा रद्द करावा किंवा त्यातून शेतमाल वगळावा.

शेती मालाची आयात-निर्यात कायद्याचे शस्त्र वारंवार शेतकऱ्यांच्या विरोधात वापरायला हे सरकार देखील कमी करत नाही, ते थांबवल्याशिवाय उत्पन्न वाढ अशक्य आहे.

शेतमालाचे वायदे-बाजार हे शेतमालाचे भाव सामान्यत: स्थिर राखण्याचे, नजीकचे भाव जाणून घेण्याचे, आणि म्हणून शेतकऱ्यांना कोणती पिके घ्यावीत हे सूचित करण्याचे महत्वाचे साधन आहे. हे साधन बंद पाडण्याचे कारस्थान तत्काळ आणि कायमचे थांबवावे. कोणत्याही मालाची टंचाई झाल्यास आयात व जादा पेरा होऊन मार्ग आपोआप निघतो.

हमी-भावाचे नाटक करून सरकारी खरेदीचा शेतकरी-घातक खेळ चालू ठेवण्यापेक्षा बाजार खुला करून व्यापार वाढवला पाहिजे. केवळ बाजार-समित्या मधील नियमन हटवून आणि देशांतर्गत बाजार-नेटवर्क करून भागणार नाही. काही काळ हमीभाव वजा बाजारभाव हा फरक शेतकऱ्यास अदा करावे. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे.

## २. शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी

बँकांची व सावकारी कर्जे, उधार-उसनवारी, जप्त्या, थकलेली वीजबिले इत्यादी एकाच रोगाची अनेक लक्षणे आहेत. रोग आहे शेती व शेतकरी शोषक धोरणाचा! शेतकऱ्याचे मरण हेच सरकारचे धोरण आहे, हे शरद जोशी १९८० पासून मांडत होते.

अल्पभूधारक असणे, जिराईत शेती, कापूस, सोयाबीन व कांद्यासारख्या हंगामी

मालाचा बेभरवशाचा व घातकी बाजार ही आत्महत्यांची तात्कालिक कारणे आहेत. शेतकरी विरोधी धोरणातून होणारे हे शोषण संपवणे हाच आत्महत्यांवरचा खरा उपाय आहे.

तोपर्यंत सर्व कर्ज मुद्दल वसुलीला १० वर्षे स्थगिती, योग्य व्याज सरकारी खर्चाने भरणे, वीजबिल वसुली थांबवणे, हा मार्ग आहे. कर्जमाफीचा गुंतागुंतीचा घोळ थांबवून हा साधा कार्यक्रम करावा. अन्यथा दर दोन-तीन वर्षांनी कर्जमाफीचे नाटक करावे लागेल. दरम्यान आत्महत्या चालूच राहतील.

शेतीचे पद्धतशीर चालू असलेले शोषण थांबवल्यास शेतकरी मूळ मुद्दल सन्मानाने भरू शकतील.

## ३. बँकाकडून पतपुरवठा

शेतीसाठी असणारे पीककर्ज- व्याजदर ३ लाख रूपयापेक्षा जास्त कर्जाला १२.२ टक्के (व्याज परताव्याची सवलत नाही), ३ लाखापर्यंत ७ टक्के (वेळेवर फेडल्यास १ लाखापर्यंतच्या कर्जाच्या व्याजावरचा पूर्ण परतावा आणि १ ते ३ लाखापर्यंतच्या कर्जाच्या रकमेवरील व्याजात ४ टक्के चा परतावा) आणि मध्यम मुदतीच्या (विहीर, पाईप लाईन, यंत्र, अवजारे इ.साठीच्या) कर्जावरील व्याजाचे दर १२.२ ते १४ टक्क्याच्या दरम्यान आहेत. (मध्यम मुदतीच्या कर्जाच्या व्याजावर कोणत्याही स्वरूपाची सूट नाही)

तीन लाखापर्यंतच्या थकीत पीक कर्जाला ११.६ टक्के या दराने व्याज वसूल केले जाते, तर ३ लाखापेक्षा जास्त रकमेच्या निर्धारित व्याज दरावर २ टक्के दंड व्याज आकारून कर्जवसुली केली जाते.

बँकांनी चक्रवाढ व्याज लावू नये आणि दाम दुपटीची वसुली करू नये यासाठी रिजर्व बँकेने निर्बंध जारी केले आहेत, तरी बँका व सोसायट्या याचे सर्रास उल्लंघन करून, जादा व्याज आणि खर्च लावून वसुल्यांसाठी जप्त्याही करतात.

व्याज परतावा संदर्भातील नियम आणि अटींच्या गोंधळामुळे असंख्य शेतकरी सवलतीच्या लाभापासून वंचित राहतात. आणि बऱ्याच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांवर परताव्याच्या रकमा बँकांनी जमा केलेल्या नाहीत अशाही तक्रारी आहेत.

शेती कर्जदारांच्या प्रचंड संख्येच्या तुलनेत बँकांकडे या कामासाठी असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत तोकडी आहे. त्यामुळे कर्ज वितरणात दिरंगाई होण्याबरोबर अशा त्रुटीही निर्माण होऊ शकतात. बँकांनी यावर त्वरीत उपाययोजना करावी.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या बँक-कर्ज खात्यांचे विशेष (न्यायिक) लेखा परिक्षण करुन कारवाई होणे गरजेचे आहे. त्यासाठी स्वैर नमुना पद्धतीने कर्ज खात्यांची सत्वर नमुना पाहणी करावी.

सर्व जगात कर्जपुरवठा ४ टक्के पेक्षा अधिक व्याजदराने होत नाही, भारतात सार्वजनिक बँकांनी केलेल्या गैरकारभाराने आणि समाजवादी अर्थव्यवस्थेमुळे शेतकरी व उद्योजक अधिक व्याजदर भरीत आहेत.

## ४. पशुधन बाजाराची कोंडी

गोहत्याबंदी कायदा वास्तवतः गोपालक विरोधी ठरत आहे. शेतकरी शेतीसाठी बैल बाळगतो निकामी बैल विकून चार पैसे मिळवतो आणि नड भागवतो. पशुधन म्हणजे शेतीसाठी एटीएम होते. पशुधन ही शेतकऱ्याची खाजगी मालमत्ता आहे. हवी तशी ती वापरायचा त्याला हक्क आहे. हा संपूर्ण कायदाच रद्द करण्याची गरज आहे. प्राणी भूतदया कायदा आणि कत्तलखाने निर्बंध पुरेसे आहेत. नीती आयोगाच्या तथाकथित दुप्पट उत्पन्न योजनेला या कायद्याने आणखीनच खीळ बसणार आहे. सुधारित (खरे म्हणजे बिघडवलेला) कायदा आणि त्यामागचे धार्मिक, राजकीय वेडाचार देशघातक आहेत.

## ५. वन्य पशु हत्या निर्बंध उठवणे

हरीण, डुकरे, नीलगाय, मोर, हत्ती आदि पीक भक्षक प्राणी शेतीची अतोनात नासधूस करतात. विशेषकरून आदिवासी व जंगली क्षेत्रात हा त्रास जास्त नुकसानीचा ठरत आहे. पिकांचे रक्षण करण्यासाठी धोका पत्करावा लागतो, त्यावर पुन्हा वनखाते व पोलिसांचा त्रास चालू असतो. अशा दिखाऊ पर्यावरणवादी कायद्यांनी ना शेती होते ना प्राणी रक्षण. हे ब्रिटीशकालीन निर्बंध शिथिल करून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे याची जबाबदारी टाकावी.

## ६. वीज बिल बाकी आणि वसुली

बाजारभाव पाडण्याच्या धोरणांमुळे शेतकरी वीजबिले व बाकी भरण्यास असमर्थ ठरला आहे. शेती किफायतशीर ठरली आणि योग्य दर्जाची वीज मिळाली तरच शेतकरी ग्राहक वीजबिले भरू शकेल. तोपर्यंत अशी वसुली अनैतिक व बेकायदा आहे.

अश्वशक्ती आधारित वीजबिल आकारणी पाण्याची नासाडी तर करतेच पण वीज मिळाली नसतानाही बिल भरावे लागते. वास्तविक मीटरप्रमाणे मोजणी होऊन बिले मिळावीत.

## ७. पीक विमा: अव्यवहार्य आणि दिखाऊ

सध्याची पीकविमा योजना पूर्वीपेक्षा बरी असली तरी आजचा सरकारी खर्चाने पीकविमा म्हणजे मुद्दाम तोट्यात ठेवलेल्या शेती धंद्यावर मेहेरबानीचा तुकडा टाकल्यासारखे आहे. त्याने ना शेतीचे भले होईल ना शेतकऱ्याचे.

खरा पीकविमा किफायतशीर शेतीतून स्वत: शेतकरीच भरेल, आणि विमा कंपन्या योग्य नुकसान भरपाई अशा नेमक्या विमाधारक शेतकऱ्यालाच देऊ शकतील. अन्यथा ही केवळ फसवणूक आहे.

आज शेती विमा केवळ पीक बुडीला अंशत: संरक्षण देऊ शकतो, मात्र बाजारातले नुकसान तो कधीच भरून काढू शकत नाही. त्यामुळे प्रश्न सुटायला फारशी मदत होणार नाही. केवळ भरपाई मिळाल्याचे खोटे समाधान होईल.



## ८. बाजार समिती: केवळ एक स्पर्धक असावी

आजवरच्या बाजार समित्या एकाधिकारशाही ग्रस्त आणि शेतकऱ्यांचे कत्तलखाने झाले आहेत. व्यापारी, दलाल, माथाडी आणि राजकीय धेंडानी शेतकऱ्यांना पद्धतशीर लुटण्यासाठी ही सोयीस्कर व्यवस्था आहे.

खुली स्पर्धा आल्याशिवाय कोणताही बाजार न्याय भाव देऊ शकत नाही. बाजार समित्यांत अन्य खरेदीदार मुक्तपणे येऊ देणे, आणि शेतकरी आपला माल कोठेही विकू शकणे हेच महत्वाचे आहे. एवढेच नाही तर कोणीही कोठेही (अगदी इंटरनेटवरही) हा माल खरेदी करू शकला पाहिजे. बाजार समिती केवळ आणखी एक बाजार स्पर्धक व्यवस्था असली पाहिजे.

किरकोळ विक्री व्यवस्थेत परदेशी गुंतवणूक व स्पर्धक येण्यास मोकळीक असेल तर स्पर्धा आणखी खुली होते. त्यामुळे शेतकरी व ग्राहक दोघांचे हित होईल.

## ९. हमीभाव व सरकारी खरेदी: एक मृगजळ

राज्याराज्यात सुमारे २४ शेतीमालाचा एकच उत्पादन खर्च काढणे व आधारभूत मूल्य तथा हमी भाव ठरवणे हे अशास्त्रीय व अव्याहारिक आहे. शिवाय हमीभावाने खरेदी करण्यासाठी गहू, तांदूळ घेणारी मोजकी राज्ये वगळता कोणतेही राज्य सरकार सक्षम नाही. याशिवाय हमी भाव कायद्याने व्यापारी खरेदीस न धजावणे, कमी भावात खरेदी केल्यास शिक्षा करण्याची तरतूद करणे हे सर्व अतार्किक आहे.

सरकारी खरेदी विक्रीमुळे मागणी पुरवठा या बाजारपेठीय तत्वालाच अडथळा तयार होतो. तसेच त्यासाठी करदात्यांच्या रकमेचा मोठ्या प्रमाणात अपहार आणि विनाकारण गैरवापर होतो आहे.

फक्त गहू, तांदूळ आणि ऊस या पिकांना हमीभाव संरक्षण देऊन भारतीय शेतीत सरकारने विकृती आणली आहे. यामुळे जमीन व पाण्याचा गैरवापर होऊन पीक वैविध्य व निवड संकुचित झाली आहे. भरड धान्ये व इतर पोषक पिके संपली आहेत. डाळी तेलबिया यांचे आयात करून दर पाडले जातात. पाम ऑईल सारख्या हलक्या आरोग्य विघातक खाद्य तेलाची आयात केल्याने देशातील तेल बियांचे उत्पादन घटले आहे. तेव्हा या पिकांचे उत्पादन वाढीचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. हमी भाव व सरकारी खरेदी वितरण व्यवस्था संपवून विवक्षित कुटुंबाना थेट रोख अनुदान देणे, व बाकी सर्व अनुदान थांबवणे हाच उपाय आहे.

स्वामिनाथन समितीचा उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा हे सूत्र तर वास्तवात येण्याची काहीही शक्यता नाही. केवळ महत्त्वाच्या २४ पिकांसाठीसुद्धा देशभर अशी यंत्रणा करणे अशक्यप्राय आहे. अशा अजागळ सरकारीकरणाच्या खोट्या कल्पनेमागे धावणे व्यर्थ आहे. देशातील एकूण ९०० दशलक्ष टन शेतमालापैकी १० टक्के जेमतेम खरेदी होत आहे. हमी भाव अव्यवहार्य कल्पना आहे व त्यासाठी असलेली सरकारी खरेदी यंत्रणा अजागळ, बेशिस्त आणि भ्रष्टाचार प्रवण असून शेतकऱ्यांचे शोषण एवढेच त्यातून फलित हाती येते. सध्या तूर, उडीद व सोयाबीन खरेदीचा वायफळ प्रयोग अनुभवतो आहोत.

शेतमाल बाजार सर्वांगाने खुला करणे, एकाधिकार व कार्टेल (संगनमताने व्यापार) संपवणे, फार तर सरकारने त्यात स्पर्धक म्हणून उतरणे हेच त्यावर उत्तर आहे.

## १०. केवळ उत्पादन नव्हे, तर उत्पन्न वाढण्याची गरज




२०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न (की केवळ उत्पादन) दुप्पट करण्याचा निर्धार भारत सरकार गेल्या दोन वर्षांपासून व्यक्त करत आहे. सरकारच्या या अशक्यप्राय, फसव्या घोषणेला धोरणाचे पाठबळ देण्यासाठी नीति आयोगाने एक कार्यक्रम प्रस्तूत केला आहे. सिंचनक्षेत्रात वाढ, माती परिक्षण, निविष्ठा, तंत्रज्ञानाचा कार्यक्षम वापर यातून उत्पादन वाढवून उत्पादन खर्च कमी करणे, दुबार पिकांखालील क्षेत्रात वाढ करून

पिकांची घनता वाढवणे, बाजार मूल्य जास्त असलेल्या (ऊस, भाजीपाला, फळझाडे) पिकांखाली क्षेत्र वाढवणे, त्याबरोबर बाजार व्यवस्था सुधारणे, शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या कमी करणे इत्यादी उपाय योजनांचा त्यात समावेश आहे. खरे तर यातील बहुतांश घटकांवर गेल्या कांही दशकांत अनेकदा चर्चा झालेली आहे.

१९९२ नंतरचा खुलीकरणाचा लाभ जर शेतीक्षेत्राला मिळू दिला असता तर हे बदल परस्पर आपोआप घडून आले असते. गेल्या तीन वर्षात नवीन सरकारने देखील पूर्वापार चालत आलेल्या शेती धोरणांमध्ये बदल केलेला नाही. वीज, पाणी, रस्ते या मुलभूत संरचनेमधेही फारशा सुधारणा केल्या नाहीत.

अधिक उत्पादनासाठी जनुक बदल पिकांचा पर्याय आवश्यक आहे. परंतु सरकार तो नाकारत आहे. त्यासाठी स्वदेशी व समाजवादी विचारांचे गट सक्रिय आहेत. तंत्रज्ञानाच्या अभावी उत्पादन घटून भारतीय शेती उत्पादन आंतरराष्ट्रीय बाजारात महाग होईल याची सरकारला चिंता नाही. माल न उठल्याने शेतकरी संकटात येईल याचीही तमा नाही.

अधिक उत्पादन होते तेंव्हा बाजार पडून शेतकरी नुकसानीत जात आहेत, याची सरकारला चिंता नाही. उलट या स्वस्ताईने बिगर शेतकरी ग्राहक खुश होईल व मते देईल असे सरकार पक्षाला वाटते. त्यामुळे सोयीप्रमाणे दर पाडण्यासाठी आयात-निर्यात कायद्याचे शस्त्र वापरायला सरकार कमी करत नाही. विरोधी पक्ष व संघटना देखील 'महागाई विरोधी' मोर्चे काढून शेतकरी उत्पन्नाला नख लावीत आहेत. (अन्य शेतकरी संघटना देखील याबद्दल शांतच आहेत)

अशा प्रतिकूल स्थितीत सापडलेला शेतकरी केवळ उत्पादन वाढवून काय मिळवणार आहे ?

## ११. शेतजमिनीचे तुकडे न परवडणारे

देशातील शेतजमिनीचे पिढीगणिक तुकडे पडून सरासरी जमीनधारणा १ हेक्टरपर्यंत आली आहे. ८० टक्के कुटुंबे अल्पभूधारक आहेत.

शेतीत दीर्घकाळ तोटा झाल्याने वरकड नफा नाही, रोकड भांडवल शिल्लक नाही अशा परिस्थितीत मुलांना वाटण्यासाठी शेतजमीन म्हणजे मूळ साधन सोडून काही उरत नाही, यामुळेही भाऊ हिस्से पडत गेले आहेत.

यातच जमीनधारणा व सिलिंग कायद्यामुळे बिगर शेतकरी किंवा शेजारचे सक्षम शेतकरी खातेदार अधिक जमीन विकत घेऊ शकत नाहीत.

अशी लहान अव्यवहार्य आकाराची शेती मालाला अगदी दुप्पट हमीभाव मिळाला तरी

परवडणार नाही, अस्मानी-सुलतानी जोखीम घेऊ शकणार नाही.

उपलब्ध जमिनीवरील जास्तीत जास्त कुटुंबे अन्य व्यवसाय उद्योगात शिरणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतीतले भांडवल टिकले पाहिजे. शेतीत बाहेरील भांडवल आले पाहिजे.

शेतीमध्ये काम करण्यासाठी मानवी श्रमाची उपलब्धी आणि मजुरांची कार्यक्षमता वरचेवर कमी होत आहे. मजुरांकरवी होणारी शेती आता जगभरातच महाग होत आहे. खूप पूर्वीच प्रगत देशांतील शेतीचे त्यामुळे यांत्रिकीकरण झाले आहे. मोठ्या आकारमानाच्या यांत्रिक शेतीला आता भारतामधेही पर्याय नाही हे लक्षात घेउन शेती धोरणांमधे अमुलाग्र बदल करावे लागतील.

यासाठी आधी शेतजमीन व शेतमाल विषयक कायदे बदलणे आवश्यक आहे.

## १२. जाचक समाजवादी भू वापर कायदे रद्द करणे

आज शेतजमीन वापराबद्दल अनेक निर्बंध आहेत. शेतकरी आपली स्वत:ची जमीनही अन्य कामासाठी वापरू शकत नाही, त्यासाठी महसूल खात्याची परवानगी घ्यावी लागते. यातून केवळ गुंडगिरी व भ्रष्टाचार बोकाळला आहे आणि शेतकरी नागवले जात आहेत.

ही व्यवस्था बदलून खातेदारास आपल्या या जमीनीचा (सार्वजनिक उपद्रव नसणारा) कोणताही वापर करता आला पाहिजे. यातूनच भूमीबाजार अधिक खुला व शेतकरी हिताचा होऊ शकेल.

## १३. भूमी अभिलेखांचे आधुनिकीकरण




जमिनींचे अभिलेख, नोंदी ठेवण्याची जुनी पद्धत कालबाह्य झाली आहे. हवे तेंव्हा अद्ययावत अभिलेख, नोंदी, नकाशे शेतकऱ्यांना मिळाले पाहिजेत. यामुळे कर्जे मिळणे, तारण, विक्री, वाटणी, भू विकसन आदि सर्व व्यवहार सोपे होतील. भ्रष्टाचार व गुंडगिरी कमी होईल. संगणक युगात हे काम करणे सोपे असून व खाजगी तंत्रज्ञांना करारावर हे काम देता येईल. शेअर बाजाराप्रमाणे शेती मालमत्तेचे व्यवहार करता येईल असे आपले उद्दिष्ट असले पाहिजे. राज्य सरकारांनी हे काम अग्रक्रमाने हाती घेतले पाहिजे.

## १४. कौशल्य प्रशिक्षण




ग्रामीण युवकांना शेतीविषयक आणि अन्य व्यवसाय कौशल्ये शिकण्यासाठी आज बहुश: सरकारी किंवा सरकार नियंत्रित संस्थांवर अवलंबून राहावे लागते आहे. अशा शिक्षणाचा दर्जा चांगला नाही. तसेच खर्च व वेळेच्या दृष्टीने ते समस्याग्रस्त आहे. वस्तुतः व्यावसायिक शिक्षण अधिक खुले व दर्जेदार करण्यासाठी सरकारी नियंत्रण कमी करण्याची गरज आहे. बाजार उपयोगी कौशल्य प्रशिक्षण खाजगी क्षेत्रच करू शकते. अर्थात सरकारी संस्था स्पर्धक म्हणून यात असू शकतील.

## १५. संरचना रस्ते व रेल्वे वाहतूक



रस्तेबांधणी व देखभाल हा सध्या थोडा बरा चाललेला विभाग आहे. तरी इतर देशांच्या मानाने आपण फार मागे आहोत. शिवारातले रस्ते अत्यंत खराब अवस्थेत आहेत. शेतीच्या तुकडेकरणामुळे रस्ते करणे अधिक अवघड झाले आहे.

मोठे व मुख्य रस्ते बांधणे आणि देखभाल हे सार्वजनिक म्हणजे सरकारचेच काम आहे. त्यासाठी पारदर्शक पद्धतीने रास्त टोल घेण्याला आमचा आक्षेप नाही.

तथापि वैयक्तिक वाटाघाटी केल्याशिवाय शेतकऱ्याच्या जमिनी घेता येणार नाहीत व जमिनीसाठी टोलमधील वाटा घेण्याचा पर्याय खुला असला पाहिजे.

शेतमालाची रेल्वे वाहतूक जलद व स्वस्त होण्यासाठी गुंतवणूक व व्यवस्थापन लागणार आहे. देशभराचा बाजार जोडण्यासाठी रस्ते व रेल्वे वाहतूक दोन्ही लागणार आहे.

## १६. संरचना : पाणी आणि सिंचन



देशात सिंचन व्यवस्था अपुरी असून अनेक सिंचन प्रकल्प रखडले आहेत, जुन्या आणि नव्याने पूर्ण झालेल्या धरण आणि विशेषतः कालव्यांची, चाऱ्यांची दुरूस्ती अवस्था अत्यंत वाईट आहे. कामे अपूर्ण आहेत. कोणतीही पाणी मोजून देण्याची पद्धत

नसल्याने पाणी व्यवस्थापन अशक्य आहे.

शहरे पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली स्वस्तात पाणी लाटत आहेत व शेतीसाठी पाणी कमी मिळत आहे. पाण्याची योग्य किंमत मोजायची तयारी नसेल तर काटकसर होणार नाही, उधळपट्टी होईल हे उघड आहे. सर्वांना सर्व फुकट किंवा स्वस्तात मिळण्याचा समाजवादी आग्रह पाणी टंचाई निर्माण करीत आहे. खेडी व शेती भरडली जात आहे.

उसाला व साखर उद्योगाला (तसेच कांही भागात गहू, तांदूळ या पिकांना) भावाबाबत सरकारी संरक्षण असल्याने जिथे ऊस शक्य नाही तिथेही साखर कारखाने उभारले आहेत. समाजवादी सहकारी व सरकारी व्यवस्थेत उद्योग स्पर्धात्मक असू शकत नाहीत. राजकीय हस्तक्षेपाचा परिणाम महाराष्ट्रातील पाणी समस्या आहे. साखर उद्योग विनियंत्रित केला आणि पाण्याची योग्य किंमत लावली तर पाण्याचा बराच प्रश्न सुटू शकतो.

नदी जोड प्रकल्पाला आमचा विरोध नाही, कारण पाणी हवेच आहे. मात्र सर्व ग्राहकांसाठी पाण्याचे योग्य मूल्य लावण्याची आवश्यकता आहे.

## १७. वीज पुरवठा आणि सौर वीज

सर्व देशात शेतीसाठी वीज कमी दाबाची व अनियमित मिळते. वीज वितरण कंपनीकडून उपलब्ध वीज आधी शहरी व औद्योगिक ग्राहकांना पुरवून, उरलीसुरली निष्प्राण वीज ग्रामीण व शेती ग्राहकासाठी दिली जाते. यामुळे पिकांचे, तसेच मोटर व इतर शेती यंत्राचे नुकसान होते. आजची शेतीसाठी दिली जाणारी वीज ही दिवसा किंवा बहुशः रात्रीची, साठवून ठेवता येत नसल्याने वाया जाणारी वीज आहे. ती शेतकऱ्यांच्या नावावर खपवून अकार्यक्षम वीज मंडळे सरकारी सबसिडी लाटत आहेत.

पूर्ण दाबाने रोज २४ तास वीज मिळणे हा शेतकरी ग्राहकाचाही हक्क आहे. सौर उर्जा क्षेत्र स्पर्धाशील आणि स्वस्त होत आहे. शेतकरी व उद्योजक माळरान, अनुत्पादक जमिनींवर उपकरणे बसवून वीज निर्मिती करू शकतील. परंतु ग्रामीण फीडर आणि सध्याची वितरण व्यवस्था यांच्याशी जोडणी झाली तरच आर्थिक दृष्टीने सौर उर्जा फायदेशीर होऊ शकेल.

## १८. संरचनेसाठी सरकारी व खाजगी गुंतवणूक

संरचनेसाठी खाजगी गुंतवणुकीचे देखील आम्ही स्वागत करतो. (आज रस्ते विकास देखील खाजगी आणि सरकारी सहकार्याने होत आहे). वीजनिर्मिती आणि सिंचन देखील खाजगी गुंतवणुकीसाठी पूर्ण खुले असले पाहिजे. शीतगृहे, प्रयोगशाळा, साठवणूक,

पॅकेजिंग, किरकोळ विक्री आदि अनेक प्रकारच्या सोयीसुविधा खाजगी गुंतवणुकीतून होऊ शकतात. याबद्दल कोंडी फोडण्याची गरज आहे.

मात्र सरकारी गुंतवणूक निदान 'सार्वजनिक' सोयींसाठी अपेक्षित आहे.

## १९. किरकोळ विक्रीत परदेशी गुंतवणूक

आजतागायत सरकारी अडवणुकीने परदेशी गुंतवणुकीसाठी किराणा बाजार अपात्र ठरला आहे. हे धोरण तातडीने बदलल्याशिवाय किराणा बाजाराचा संरचना विकास होऊ शकत नाही. हे होऊ दिले असते तर शीतगृहे, वेष्टन व्यवस्था (पॅकेजिंग), योग्य किंमतीसाठी बारकोडिंग, वाहतूक, प्रक्रिया आदि क्षेत्रे सुधारली असती.

आज अशी परवानगी उशिरानी दिली असली तरी ती केवळ स्थानिक उत्पादनासाठी असल्याने, यात उद्योजक गुंतवणुकीसाठी यायला तयार नाहीत. केवळ देशी मालच विकला पाहिजे हा हेका स्पर्धात्मक क्षेत्रात चालू शकत नाही. त्यात नुकसान ग्राहकांचेही आहे पण जास्त नुकसान शेतकरी व शेतीचे झाले आहे.

## २०. आच्छादित शेती

जागतिक वातावरण बदलांमुळे इथून पुढे उघड्यावरची शेती करणे आणि निसर्गावर हवाला ठेवणे परवडणारे नाही. खते, कीटकनाशके, सुक्ष्म पोषक द्रव्ये आणि आर्द्रता काटकसरीने व परिणामकारकतेने वापरण्यासाठी देखील शेती आच्छादित पद्धतीने करावी लागेल. यासाठी भांडवल आणि तंत्रज्ञान तर लागेल. साठवणूक, प्रक्रिया व बाजाराची विस्तृत व्यवस्था लागेल. चोवीस तास चांगल्या दर्जाचा वीजपुरवठा लागेल, तरच अशी हायटेक शेती परवडू व टिकू शकेल. राजकीय लाभासाठी गरिबांच्या नावाने भावपाडू धोरणे चालू असताना अशी शेती करता येणार नाही.

## २१. शेतमाल प्रक्रिया उद्योग

भारतात दीर्घकाळ शेतमाल प्रक्रिया निर्बंध असल्याने आणि पुरेशा संरचना सोयी नसल्याने कोंडी झाली आहे. त्यामुळे शेतकरी व शेतीचे नुकसान होऊन वर स्थानिक रोजगार निर्मितीची प्रक्रियाही खुंटली आहे. भाजीपाला आणि फळे नाशवंत असल्याने तीस टक्के या मालाचे नुकसान होत आहे. शेतकरी अगतीक असल्याने शेतकऱ्यांची सौदा शक्ती देखील दुबळी झाली आहे. यामुळे बाजारात शेतकऱ्यांची अधिक अडवणूक होते आहे.

सर्व खाद्य-अखाद्य शेतमाल कमी-अधिक प्रक्रिया करून अधिक चांगल्या किंमतीला

विकला जाऊ शकतो. प्रक्रिया उद्योगातील मुल्यवर्धनाचा (Value Addition) लाभ शेतकऱ्यांना मिळण्यासाठी आधी त्यातले अडथळे काढून टाकावे लागतील.

म्हणून या क्षेत्राच्या विकासासाठी कौशल्य प्रशिक्षण, जमीन वापर खुलीकरण, वीज पाणी, वित्तपुरवठा, परवानगी प्रक्रिया, बाजार सोयी विकसित होण्याची आवश्यकता आहे. विविध समाजवादी निर्बंध नसते तर ही प्रक्रिया आधीच घडून आली असती.

## २२. कृषी कल्याण मंत्रालयाऐवजी कृषी व्यवसाय मंत्रालय




भाजप-रालोआ सरकारने शेती मंत्रालयाचे नामकरण ‘किसान कल्याण मंत्रालय’ असे केले आहे. हे भाबडेपणाचे किंवा फसवे नामकरण आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. सरकारी पद्धतीने शेतकरी कल्याण करण्याऐवजी शेती व्यवसायावरची सगळी बंधने उठवा. शेती करायची कि अन्य काही करायचे ते स्वतंत्र शेतकरी ठरवील. तोपर्यंत आपल्या इतर मंत्रालयाचे शेतकरी विरोधी उद्योग थांबवा. (उदा: कांदा व डाळींचे भाव पाडण्यासाठी किमान निर्यातमुल्य लावणे किंवा मोझांबिक बरोबर आयात करार वगैरे)

## २३. अन्न महामंडळ बरखास्त करा



शेतकऱ्यांचे अन्नधान्य उत्पादन स्वस्तात घेऊन इतरांना स्वस्तात वाटप करणे म्हणजेच अन्नसुरक्षा! राजकीय स्वार्थ साधण्यासाठी हा समाजवादी कार्यक्रम अनेक दशके चालू आहे. गेली काही वर्षे अपवाद सोडता यातून शेतकऱ्यांची प्रचंड लूट झाली आहे.

अन्न महामंडळ कमालीचे भ्रष्ट असून मोठ्या प्रमाणावर अन्नाची नासाडी होत आहे. याचबरोबर इतर भरड धान्याची शेती यातून संपत चालली आहे. हरित क्रांतीनंतर तरी या महामंडळाची काही गरज उरलेली नाही. जागतिक व्यापार करारात अशा सबसिडीने खोडा

घातला जातो आहे. बरखास्त महामंडळ कर्मचाऱ्यांना इतर कामात सामील करून घ्यावे.

अन्न महामंडळ बरखास्त करण्यास एक पर्याय म्हणजे ते सरकारच्या अखत्यारीतून बाहेर काढून स्वायत्त व स्पर्धात्मक करणे हा आहे. मात्र यासाठी सरकारने आजपर्यंत दिलेल्या भांडवलावरच चालवू द्यावे, पुन्हा अनुदान वगैरे देऊ नये.

अन्न महामंडळाऐवजी अन्नधान्य खुल्या बाजारात आणणे आणि दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना त्यासाठी फूड कुपन मार्फत थेट सबसिडी देणे अधिक कार्यक्षम आणि फायद्याचे ठरेल. या कुटुंबाना देखील चांगले धान्य निवडीचे स्वातंत्र्य मिळेल.

## २४. शेतीवर आयकर

शेतीवर /शेतकऱ्यांवर आयकर लावण्याची अधून मधून चर्चा होत असते. आयकर लावला जात नाही ही जणू मेहेरबानी असल्याचा आव आणला जातो. याबद्दल आमची भूमिका अशी:

शेती फायदेशीर असल्यास आयकर लावणे अगदी योग्य आहे. आयकर लावल्याने शेतीचा लेखाजोखा तयार होईल, नफा तोटा सर्वांना कळेल. शेतकऱ्यांना काहीही फुकट अथवा सवलतीने नको आहे. मात्र आज सर्वच शेती तोट्यात आहे, जवळजवळ सर्वच खातेदार कर्जबाजारी असून बहुतेक खातेदार अल्पभूधारक आहेत, त्यामुळे आज हा आयकर लावणे निरर्थक आहे.

अनेक मंडळी आपले इतर उत्पन्न दडवून ते शेतीतून येत असल्याचे दाखवून फायदा उपटत आहेत. आज आयकर कायद्यातल्या तरतुदींनी हे अवघड झाले आहे, हे स्वागतार्ह आहे. जीएसटी व डिजिटल व्यवस्थेत उत्पन्नाचा स्त्रोत समजून येत आहे. त्यामुळे केवळ या करचोरांना शिक्षा करण्यासाठी सर्व शेतीला आयकर लावणे आवश्यक राहिलेले नाही.

एक तत्व म्हणून, आवश्यक वस्तू कायदा व शेतीवरचे विविध निर्बंध उठवल्यास, आयकर लावण्याचे स्वागत असेल.

## २५. शेती व्यवसाय धोरण

शेती उत्पादन वाढ ही दुय्यम बाब असून शेती व्यवसाय फायदेशीर होणे हेच प्रछंन्न धोरण असायला पाहिजे. रालोआ सरकारचे 'दुप्पट उत्पन्न करू' हे धोरण व कार्यक्रम फसवा आहे. यातून कदाचित उत्पादन वाढेल पण उत्पन्न किंवा नफा वाढेल याची शाश्वती नाही हाच धडा मिळला आहे. यासाठी आधी बाजार व्यवस्था खुली व सक्षम करायला लागेल.

देशात गहू तांदूळ व साखर ऊस या उत्पादनांना अवाजवी संरक्षण मिळाले आहे,

त्याला स्वस्त धान्य योजना अन्नसुरक्षा योजना कारणीभूत आहे. त्यामुळे जास्त पाणी लागणारी पिके करायच्या मागे आपण लागलो आहोत. हे संरक्षण वाजवी पातळीवर ठेऊन क्रमश: कमी केले तर नवी पीक पद्धती येईल. ती देशी व जागतिक बाजारात टिकेल व बदलेल.

देशात कुपोषण मोठ्या प्रमाणात आहे, यात प्रथिन कमतरतेचा मोठा भाग आहे. डाळी व तेलबियांची देशी बाजारपेठ सरकारी धरसोड व धोरणांनी मरणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. विदेशात डाळी व तेलबिया (उदा: मोहरी, सोयाबीन) क्षेत्रात जनुक बदल पिकांनी क्रांती घडवली आहे. भारतीय शेतकरी यापासून वंचित ठेवला असल्याने ज्यात भारताला तौलनिक फायदा आहे असे कमी पाणी लागणाऱ्या कोरडवाहू पिकांचे क्षेत्र धोक्यात आले आहे. भारतीय संशोधकांनी तयार केलेल्या जीएम मोहरीला आजही अन्याय्य बंदी आहे.

पाम तेल हे मानवी आरोग्याला घातक असून जागतिक करारानुसार या आयातीवर निर्बंध घालणे शक्य आहे. या उपायाने देशातल्या तेलबियांचा बाजार सुधारून लागवड वाढू शकेल.

कपाशीच्या बाबतीतही जनुक बदल वाणांना होणारा अशास्त्रीय व अव्यवहारी वाढता विरोध आवरला नाही तर कापूस पीक आणि आपल्या हातची आंतरराष्ट्रीय बाजारपेठ जाणार आहे. याबरोबर देशी कापड उद्योगही मार खाईल. आज कापसात उद्भवलेल्या शेंदरी (गुलाबी) बोंडअळीच्या प्रादुर्भावास नियंत्रणात आणण्याचा उपाय देखील जैविक तंत्रज्ञानाच्या संशोधनातूनच उपलब्ध झालेला आहे. ऑस्ट्रेलिया सारख्या कापूस पिकवणाऱ्या देशात कापसाच्या या नवीन बी.जी.- ३ या वाणाची लागवड २०१५ सालापासून यशस्वी ठरल्यामुळे प्रचलित झाली आहे.

जागतिक व्यापार संघटनेबरोबर व्यवहारी तडजोड करून भारतीय शेतीमालाला विदेशी बाजारपेठ मोकळी होईल असे पाहीले पाहिजे. वाटाघाटीत अन्नसुरक्षा हा केवळ अडवणुकीचा मुद्दा होऊ नये.

शेतीविषयक धोरण केंद्र सरकार ठरवते आणि राज्ये केवळ अंमलबजावणी व सेवा पुरवतात. त्यामुळे शेतकरी समस्येचे खरे धोरणात्मक निराकरण केंद्र सरकारच करू शकते.

शेती धोरण केवळ शेतकी मंत्रालय ठरवू शकत नाही, त्यासाठी अनेक मंत्र्यांनी एकत्र काम करायला लागेल (कायदा खाते, नागरी पुरवठा, रस्ते व वाहतूक, उर्जा, जलसिंचन, व्यापार पणन, ग्रामीण विकास, वन व पर्यावरण, अन्न व प्रक्रिया उद्योग, उद्योग मंत्रालय आणि अर्थखाते.) सर्वच मंत्रिमंडळाने आणि खात्यांनी एकत्र काम केले तरच शेतीची समस्या सुटू शकते.

# शरद जोशी यांची काही विचारसूत्रे

## तात्विक-

१. कोणतीही व्यक्ती किंवा ग्रंथ चिरंतन सत्य असू शकत नाही.
२. व्यक्तीद्वेष आणि व्यक्तीप्रेम सोडल्याशिवाय निखळ विचार शक्य नाही.
३. कोणत्याही विचारवंताच्या विचारात केंद्रबिंदुशी काही स्पष्टता असते, त्यापासून दूर जाऊ तशी धूसरता येते.
४. सामुहिक निर्णय चुकतात, व्यक्तिगत निर्णय अचूक असण्याची अधिक शक्यता असते. म्हणून सर्व देश चालवण्यासाठी एक नियोजन व्यवस्था चालत नाही.
५. व्यक्तिगत स्वार्थ हाच अर्थव्यवस्थेचा पाया असतो. त्याग आणि परार्थामागे देखील एक दूरस्थ आणि निहित स्वार्थ असतो.
६. माणसाच्या विचार करण्याचे इंद्रिय मेंदू नसून त्याचा खिसा आहे.

## सामाजिक-

७. जगातल्या विविध सीमा वेळोवेळी तोडणाऱ्या व्यक्ती श्रेष्ठ आहेत. याचे दीर्घकालीन परिणाम चांगलेच असतात. भले तात्कालिक दुष्परिणाम होवोत.
८. विकास म्हणजे स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणे, अधिक निवडीचे स्वातंत्र्य.
९. स्त्री-मुक्तीतच स्त्री-पुरुषमुक्ती.
१०. स्त्रीमुक्ती ही स्त्री-चळवळीपेक्षा तंत्रज्ञानाने ( उदा. पिठाची गिरणी) जास्त झाली.
११. लक्ष्मी-मुक्ती हे मंगल सावकाराचे देणे आहे. (सासरी स्त्रियांच्या नावावर मालमत्ता हक्क देणे, नाव लावणे)
१२. दोन प्रौढ व्यक्तींमधले परस्पर संमतीने होणारे संबध पूर्णपणे वैध व नैतिक असतात. (त्यात सरकारने लक्ष घालू नये)
१३. कमीत कमी सरकार  हेच चांगले सरकार असते, सध्याच्या शासनाच्या पसाऱ्याची छाटणी करावी लागेल.
१४. सरकार क्या समस्या सुलझाये, सरकार यही समस्या है.
१५. प्रत्येक व्यक्ती समान नसून एकमेवाद्वितीय आहे.
१६. विकासाचा प्रवाह थांबला कि त्यात क्षुद्रवादाचे किडे होतात
१७. स्वयंसेवी संस्था या आर्थिक विकासाच्या मार्गातले अडथळे होतात. बस्स करा समाजसेवेचे ढोंग/दुकानदारी.
१८. गुंडा, अफसर, नेता, तस्कर, मंदिर-मस्जिदवादी, बाये, दाये, मध्यम मार्गी; देश

के दुश्मन, देश के दुश्मन!

१९. लोकशाही निर्दोष आणि सर्वश्रेष्ठ नाही, पण त्याहून बरी व्यवस्था नाही.

२०. समाज एका दोषास्पद व्यवस्थेकडून दुसऱ्या कमी दोषास्पद व्यवस्थेकडे जात असतो; पूर्ण निर्दोष अशी व्यवस्था नसते.

२१. जातीयता हा प्रश्न आहे, आरक्षण हे त्यावरचे उत्तर नाही.

२२. आरक्षण हा एका पेंढीवर शंभर गाई हंबरत ठेवण्याचा कार्यक्रम.

## आर्थिक -

२३. खाजगी मालमत्तेचा अधिकार हा खुल्या अर्थव्यवस्थेचा पाया आहे.

२४. कायद्याचे राज्य असल्याशिवाय खुली अर्थव्यवस्था शक्य नाही.

२५. सरकारीकरण की खाजगीकरण असा मुद्दा नसून एकाधिकार नको, खुली स्पर्धा पाहिजे हा मुद्दा आहे.

२६. सगळेच प्रचलित पक्ष समाजवादी आहेत. सरकारची अडवणुकीची शक्ती वाढवणे आणि त्यातून आपला वाटा मिळवणे, हाच त्यांचा हेतू असतो.

२७. गरीबी दूर करण्यासाठी काहीही करण्याची गरज नाही, फक्त गरिबांच्या छातीवरून उठा.

२८. खरा विकास सहज आणि नैसर्गिक असतो, मृगाच्या सरीने जमिनीतून कोंब फुटतात, त्यासाठी वेगळे काही करावे लागत नाही.

२९. मार्क्सचा ऐतिहासिक वस्तुवाद मान्य आहेच, पण त्याचे अर्थशास्त्र दखलपात्र नाही.

३०. मार्क्सवाद समाजवादाचा पराभव अटळ आहे. (१९८८ मध्ये कम्युनिस्ट रशिया कोसळला तत्पुर्वी आठ वर्षे आधी केलेले भाकीत)

## शेतीविषयक -

३१. जो माणूस निदान सहा महिने शेतीवर जगून दाखवेल तोच शेती अर्थशास्त्र समजू शकतो.

३२. पूर्ण सुरक्षित सरकारी नोकरी करणाऱ्याना दर १० वर्षांनी वेतनवाढीसाठी आयोग असणे हेच पटणारे नाही.

३३. या देशात भारत आणि इंडिया असे दोन देश आहेत. (ज्याचे पोट शेतीवर तो भारत)

३४. अर्थव्यवस्थेतल्या बांडगुळाची छाटणी करावी लागणार आहे

३५. पोशिंद्यांची लोकशाही पाहिजे.

३६. प्रत्येक प्रश्नावर आंदोलन करता येते असे नाही. त्याची जागा व वेळ निवडावी लागते.

३७. आंदोलन करण्यापेक्षा ते मागे घेण्यात जास्त कौशल्य लागते.

३८. मुल्ला नसिरुद्दीनची गोष्ट: अंगठी रानात हरवली पण मी अंगणात शोधतोय कारण इथे

उजेड आहे. (तात्पर्य: लोक खरे कारण सोडून सोयीची कारणे सांगतात)

३९. भांडवल, श्रम, तंत्रज्ञान, बाजारभाव ही सारी कोणत्याही उद्योगाची मूलतत्वे आहेत. (शेतीलाही हेच लागू आहे)

४०. शेतकऱ्यांना हवे बाजारपेठ आणि तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य.

४१. सद्यस्थितीत सर्व सरकारी देणी आणि कर्जे अनैतिक आणि बेकायदेशीर आहेत.

४२. शेती ही जीवनशैली/संस्कृती नसून एक व्यवसाय आहे

४३. सूट सबसिडीचे नाही काम, भीक नको **हवे** घामाचे दाम (१९८० पर्यंत)

४४. (१९९२ नंतर) सूट सबसिडीचे नाही काम भीक नको **घेऊ** घामाचे दाम!

४५. शेतीची लूट चालूच आहे, फक्त लुटणारे बदलले.

४६. गोरा इंग्रज जाऊन काळा इंग्रज आला आहे.

४७. शेतकरी तितुका एक एक. शेती बागायती असो की जिरायती, लहान असो की मोठी' तोटा आणि कर्ज होतेच. (पीक कोणतेही लावा, त्यातून तोटाच उगवतो)

४८. शेतीतच एका दाण्याचे शंभर दाणे होतात. त्यातूनच भांडवल निर्मिती होते. जगाचा इतिहास शेतीच्या लुटीचा इतिहास आहे. (मात्र आता हे गुणाकाराचे तत्व संगणक क्रांतीला देखील लागू होते.)

४९. शेतीच्या शोषणातूनच भांडवल निर्मिती होत असते, पण म्हणून शेतकऱ्यांची लुट करण्याची गरज नाही.

५०. नेहरू व्यवस्थेतून शेतकऱ्यांचे पद्धतशीर शोषण झाले.

५१. शहरी झोपडपट्ट्या म्हणजे निर्वासित भारत.

५२. देशातल्या आजच्या शहरी झोपडपट्ट्या म्हणजे समाजवादी धोरणाने देशाला झालेला कर्करोग आहे.

५३. शेतकऱ्यांनादेखील इतर नागरिकांप्रमाणे जगण्याचा हक्क आहे.

५४. विकासाच्या नावाखाली भीकवाद नको.

५५. शेतीमालाची मुबलकता असेल तर लिलाव, तूट असेल तर लूट (हे सरकारी धोरण)

५६. शरीराला लागणाऱ्या उष्मांकावरून रोजगाराचा दर ठरवायला शेतकरी काही पोल्ट्रीमधली कोंबडी नाही, माणूस आहे.

५७. शेतीवर आज ५५ टक्के लोक जगतात, ते प्रमाण ५ टक्के झाले पाहिजे. मात्र त्यासाठी खुली/अनुकूल अर्थव्यवस्था लागेल.

५८. आपण पिकवू तो माल शासन किफायतशीर भावाने विकत घेईल, अशी अपेक्षा करता येणार नाही.

# स्वामिनाथन अहवाल आणि आजचे शेतकरी आंदोलन

**- डॉ. शाम अष्टेकर**

शेतकरी संपानिमित्ताने विविध संघटनानी स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार सरासरी उत्पादन खर्च अधिक ५० टक्के इतका हमीभाव देण्याची लोकप्रिय मागणी केली आहे. मूळ अहवालाचे चार पानी टिपण पीआरएस लेजीस्लेटीव वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच खुद्द अहवालाचा सारांश देखील उपलब्ध आहे. स्वामिनाथन अहवाल समाजवादी असून शेतकरी-स्वातंत्र्याला मारक आहे, असा शरद जोशी यांचा प्रमुख आक्षेप होता. स्वामिनाथन अहवाल (२००६) स्वतः काँग्रेसच्या संयुक्त पुरोगामी आघाडीने नजरेआड केला. भाजपने मात्र केवळ मते मिळविण्यासाठी, काहीही अभ्यास नसताना उत्पादन खर्च अधिक ५० टक्के हमीभाव देण्याचे आश्वासन जाहीरनाम्यात घातले. प्रत्यक्षात सत्तेवर आल्यावर हा हमीभाव देता येणे अशक्य आहे याची जाणीव झाल्यानंतर माघार घेतली. हमीभाव मागण्यासाठी दाखल झालेल्या जनहीत याचिकेत उत्तर देताना सुप्रीम कोर्टात आपली चुक मान्य करून असा हमीभाव देता येणे असे सांगितले. त्यानंतर आपली बाजू सावरण्यासाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न दोन वर्षात दुप्पट करण्याची भाषा सुरु केली.

स्वामिनाथन अहवाल दिसायला शेतकरी केंद्रीत वाटला तरी मुळात तो अन्नसुरक्षा कायद्याच्या भोवती रचला गेला आहे. या अहवालात जमीन वाटपापासून ते डोंगरीशेती, जिरायती शेती, मत्स्य व्यवसाय, पशुधन, चारा महामंडळ, ऊस, वनौषधी पिके, जैवइंधन, उत्पादकता, कर्जे व कर्जमाफी, शेतकरी आत्महत्यांची गणना, रयत बझार आदि अनेक कलमे आहेत.

**शेती उपयोगी मुद्दे :** आमच्या मते समितीच्या शेती उपयोगी मुद्दे असे आहेत, शेती हा विषय केंद्र-राज्य सामायिक यादीत घालण्यासाठी घटनादुरुस्ती करणे, सिंचन व भूजलसाठा वाढवणे, मातीपरिक्षण, कमी व्याजदराने अधिक व सुलभ पतपुरवठा, राष्ट्रीय बाजारपेठ, पशुधन विकास, किसान क्रेडीट कार्ड, पीकविमा व पशुविमा, आरोग्य/वृद्धापकाळ विमा, पाणी, वीज, रस्ते यात अधिक गुंतवणूक, अन्नाची पोषक गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रयत्न, कमोडीटी मार्केट व वायदे बाजार, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी काही स्थानिक मदत, भावपाडू आयात रोखणे, आदिवासी वनवासी यांना काही वनउपज खरेदी विक्रीचे हक्क इत्यादी बाबी आहेत.

**निरर्थक मुद्दे:** निरर्थक शिफारशीत राष्ट्रीय स्तरावर भूमी पीक वापर सल्लागार मंडळ, सामाजिक अन्नधान्य पेढ्या, गहू तांदूळ याशिवाय इतर पिकांनाही हमीभाव लावणे (म्हणजे परत सरकारी खरेदी), सहकारातून सरकारी हस्तक्षेप काढणे, शेतमाल भाव स्थिरीकरण निधी, बचतगट, शेतकरी कुटुंबास सनदी नोकरवर्गाच्या वेतनाइतके निव्वळ उत्पन्न मिळवून

देणे हे मुद्दे आहेत.

**हानिकारक मुद्दे :** हानिकारक बाबींमध्ये सार्वत्रिक अन्नसुरक्षा अन्नहमी हा मागील सरकारचा आवडता मुद्दा आहे; यामुळे भ्रष्ट व अकार्यक्षम अन्न महामंडळ चालूच राहील, त्याऐवजी सवलत धान्य टोकन किंवा थेट कॅश सबसिडी देऊन 'राष्ट्रीय' बाजारपेठ खुली करता आली असती. रोजगारहमी योजनेची शिफारसही आहे; पण त्याने शेतीला मजूर मिळणे कमी होईल. अशी योजना प्रथम भ्रष्ट होते नंतर नष्ट होते. याचा विचार अहवालात नाही.

शेतीसाठी स्वस्त 'समुचित' तंत्रज्ञान अशी एक शिफारस आहे, त्यायोगे छोटी शेती कसत राहणे हेच गरीब भारतीय शेतकऱ्यांचे भागधेय होईल, पण वेळोवेळी बाजारात टिकेल तेच तंत्रज्ञान वापरावे लागते. (उदा: आजच खादी व हातमाग सबसीडी देऊन टिकवावे लागतात). स्थानिक शिवारपातळीवर पीकवार 'समूहांनी' व्यवस्थापन करावे असे समिती सुचविते (पण नफा तोट्याचा हिशेब करणारी शेती कंपनी करण्याचे बोलत नाही.) बांधाबांधावर भावाभावाची कोर्टकचेरी चालू असताना हे कसे होणार? सुपीक जमीन कंपन्यांना बिगर शेती वापरासाठी विकता येणार नाही असे अहवाल म्हणतो, पण हे ठरवणार शेतकरी की महसूल खाते ? थोडक्यात, या शिफारशी शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या आहेत.

जागतिक व्यापार संघटनेच्या उत्पादन तथा सेवा व्यापाराच्या क्रमश: खुलीकरणाच्या बाबतीत स्वामिनाथन समिती नकारात्मक आहे. परदेशी शेती उद्योगाशी म्हणजे जागतिक बाजारपेठेत भारतीय शेतकरी स्पर्धा करू शकणार नाही असे समिती सांगते. याचा अर्थ शेतीसाठी आहे तीच बंदिस्त अर्थव्यवस्था (हमीभाव आणि सरकारी खरेदी) आली. थोडक्यात समिती जुन्याच दिवाळखोर समाजवादी योजना सुचवते.

या समितीची सर्वात लोकप्रिय शिफारस म्हणजे शेतमालाच्या सरासरी उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा धरून भाव देणे. शेतीमालाचे बाजारपेठेत मागणी पुरवठ्याने दर ठरतात. त्यामुळे किती नफा तोटा होणार हे अंतिमत: बाजारातच ठरते. सरकार कायम सर्व पिकांना नफा देणार असल्यास भारतव्यापी सरकारी खरेदी व वितरण यंत्रणा आणि त्यासाठी सकल शेती उत्पादनाएवढी अंदाजपत्रकीय तरतूद लागेल. यासाठी सरकारी शेतमाल वितरण यंत्रणा तयार न केल्यास शेवटी सरकारने खरेदी केलेला सर्व माल व्यापाऱ्यांनाच विकावा लागेल. आज तूर, उडीद, सोयाबीन सरकारी खरेदी व्यवस्थेतील गोंधळ पाहता हमीभाव देणेही शक्य झाले नाही. तर ५० टक्के जादा भाव कसे देणार ?

पिकांचा उत्पादन खर्चही राज्याराज्यांत साहजिकच वेगवेगळा आहे. उदा. आजच गव्हाचा हमीभाव पंजाबात लाभाचा, पण मध्यप्रदेशात जेमतेम व महाराष्ट्रात तोट्याचा आहे. त्यामुळे ५० टक्के नफा कशावर आणि कोण देणार? राज्य कृषीमूल्य आयोगाचे

अध्यक्ष श्री. पाशा पटेल यांच्या मतानुसार प्रत्येक राज्याने त्यांच्या उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा दिला तर प्रत्येक प्रांतात सरकारी खरेदीचा वेगळा भाव राहील.

पण व्यापारी, दलाल आणि सीमांत शेतकरी शक्य ते मार्ग वापरून फायद्याच्या प्रांतीय केंद्रांवर आपला माल आणतील. हे थांबवण्यासाठी आहे ती सर्व यंत्रणा आणखी भ्रष्ट होईल. सरकार हमीभावाने निवडक पिके काही प्रमाणात खरेदी करून जास्त पैसे देऊ शकते, पण माल खरेदी केला तरच. वेगवेगळ्या राज्यांमध्ये गहू, तांदूळ व ऊस वगळता बहुतेक पिकांचे हमीभाव कागदावर राहतात. भाव पडले आणि खरेदी सुरु झालीच तर कण्हत कुंथत अर्धीही खरेदी होत नाही.

हमीभावाने पीक पद्धती बिघडते, हे समिती विसरते. उदा. दुष्काळी महाराष्ट्रात वारेमाप ऊसाचे पिक. हमीभावाचा अजब अर्थ असा, व्यापाऱ्यांनी या भावाखाली शेतमाल खरेदी केल्यास गुन्हा ठरतो. कोणताही व्यापारी तोटा सहन करून माल खरेदी करणार नाही. असे बंधन घालणे हे बाजाराच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासणारे आहे. प्रत्यक्षात होते असे की सरासरी हमीभाव हा कमी भावपातळीवर ठेऊन खरेदी करायची आणि हंगामानंतर बाजार वाढले की व्यापारी आपली चांदी करणार. मात्र शेतकऱ्याला फायदा मिळणार नाही हे ठरलेले आहे.

उत्पादन जास्त झाले तर सरकारी खरेदी यंत्रणेत शेतकऱ्यांचे हाल होतात. तूर, इतर डाळवर्गीय पिके व सोयाबीन/तेलबियांचा धडा आपल्यापुढे आहेच. आवश्यक वस्तू कायदा १९५५ वापरून साठेबाजी प्रतीबंध करण्यासाठी, ऐन हंगामात व्यापारी वर्गाची खरेदी रोखली गेली. आज बहुतांश शेतकरी तोट्यात व कर्जग्रस्त आहे. त्याचे कारण ना रास्तभाव खरेदी, ना खुला बाजार हे आहे. समितीचा सर्व पिकांना हमीभाव व ५० टक्के नफा द्यायचा कार्यक्रम करायचा तर 'राष्ट्रीय बाजारपेठ' कशासाठी लागणार आहे? सध्या **रास्त** भावच मिळत नाही तर **जास्त** कुठून मिळणार?

भारतात ६०% जनता तुकड्या-तुकड्यांच्या शेतीवर उन्हातान्हात राबून कशीबशी जगत आहे. आजचा शेतीव्यवसाय सामान्यपणे अत्यंत बेभरवशाचा आणि नुकसानीचा आहे. त्यासाठी एका बाजूला सिंचन, संरचना, पतपुरवठा इत्यादी बाबी सरकारने पुरवणे आवश्यक आहे. पण पिढीजाद जमीनधारणा घटण्याचे मोठे संकट आले आहे. आज ५ एकरावर धारणा असणारे फक्त १५ टक्के शेतकरी आहेत. हे न बघता स्वामिनाथन समिती लँड सिलिंग व जमीन वाटपाचाच आग्रह धरते. शेतकरी विरोधी कायद्यांचे जंजाळ व महसूल खात्याचा कारभार शेतकरी शोषणाचा स्त्रोत आहे, स्वामिनाथन समिती याबद्दल गप्प आहे. कमाल जमीन धारणा कायदा उठल्याशिवाय जमीन खरेदी विक्रीत व शेतीत बाहेरील भांडवल व तंत्रज्ञान येणार नाही हे समिती झाकून ठेवते. शेतीवरची कुटुंबे मोठ्या प्रमाणावर इतर उद्योग/सेवा क्षेत्रात जाण्यासाठी सध्याच्या जमिन तुकड्यांचे कायदेशीर व

व्यावसायिक तत्वावर एकत्रीकरण व आधुनिक व्यवस्थापन अपरिहार्य आहे. याबाबत स्वामिनाथन समिती काही दिशा दाखवत नाही.

जीवनावश्यक सेवा वस्तू कायद्यातून शेतमाल बाहेर काढणे, आणि शेतीविषयक कायदे परिशिष्ट ९ च्या तुरुंगातून सोडवणे याबद्दल समिती गप्प आहे. या रालोआ सरकारने शेती क्षेत्रात बाजार समिती एकाधिकार संपवणे, राष्ट्रीय बाजार नेटवर्क, युरिया पुरवठा, माती परिक्षण, पीक विमा, पीक व्याज सवलत, सिंचन तरतूद, आदि  सुधारणा सुरु केल्या आहेत. त्यामुळे नफा किंवा दुप्पट उत्पन्न मिळणे दुरापास्त आहे. कारण शेतमालाचे बाजारभाव पाडण्याची जुनी सरकारी खोड जात नाही. यासाठी आवश्यक वस्तू कायदा वापरून शेतकऱ्यांची देशांतर्गत कोंडी करणे आणि परदेशी व्यापार कायदा (१९९२) वापरून आयात-निर्यात कोंडी करणे, हा समाजवादी सरकाराचा आवडीचा शेती घातक खेळ आहे. भाजपही यात तेवढाच सामील आहे. श्री योगेंद्र यादव आदी समाजवादी व डावे पक्ष या कायद्यांविरुद्ध आंदोलन करतील काय?

स्वामिनाथन आयोगाचे आश्वासन देणाऱ्या रालोआ सरकारने कांदा टंचाईच्या काळात किमान निर्यातमूल्य लावून निर्यात रोखली, भाव पाडले आणि हातची परदेशी बाजारपेठ घालवली. जादा उत्पादन झाले तेंव्हा आता निर्यातबंदी उठवले व बाजार हस्तक्षेप करून निर्यात अनुदान दिले तरी गेली २-३ वर्षे कांदा उत्पादक नागवला गेला आहे. हाच प्रकार तुरी बाबत झाला. साखर कारखान्यांना साखर कोटा लावून ग्राहकांना सांभाळले आहे. ऐन हंगामात मक्याची आयात करून त्याचे भाव पाडले गेले.

स्वामिनाथन अहवाल आधुनिक बियाणी मागतो पण जनुकबदल/जीएमबद्दल गुळमुळीत भूमिका घेतो. केंद्रीय व राज्याचे कृषिमंत्री मोन्साटोला (म्हणजे सरळसरळ जीएमला) हद्दपार करू पाहतात. पण आज चांगले बियाणे कसे मिळेल याबद्दल गोंधळ आहे. कापसाच्या बाबतीत राउंड अप रेडी बिटी बियाण्याला बंदी असून शेतकरी अनधिकृतपणे ते लावीत आहेत.

स्वामिनाथन हे आदरणीय कृषी शास्त्रज्ञ आहेत. त्यासाठी हवे तर त्यांना भारतरत्न द्यावे, असे श्री. शरद जोशी म्हणाले होते. पण स्वामिनाथन कृषी अर्थशास्त्रज्ञ नाहीत. दिवंगत शरद जोशी यांनी शेतकरी हिताबरोबर राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे भान सदैव ठेवले. शेतकऱ्यांनी सोन्याचा पिंजरा मिळाला तरी त्याचा मोह धरू नये, असे प्रतिपादन केले. निवडणूक जिंकण्यासाठी साठी रालोआने असंभव पण लोकप्रिय घोषणा केली, पण ते निभवणे अशक्य होते. परंतु शेतकरी आक्रोशावर स्वार होऊ पाहणाऱ्या नेत्यांनी अवास्तव व नोकरशाही आर्थिक कार्यक्रम सोडून खऱ्या शेतकऱ्यांच्या व्यवसाय स्वातंत्र्याचा आग्रह धरला तर बरे होईल.

# ऊस दर आणि आजचे शेतकरी आंदोलन

**- अजित नरदे**

महाराष्ट्रात ऊस दर कमी मिळाला तरी शेतकरी आंदोलनामुळे आम्हाला जादा दर मिळतो, असा आभास शेतकऱ्यामध्ये निर्माण करण्यात काही शेतकरी नेते यशस्वी होतात. त्यामुळे ऊस परिषदेला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत राहतो. मागील हंगामातील ऊस दराच्या त्रुटीबद्दल एक शब्दही न बोलता, श्री. राजू शेट्टी फक्त येणाऱ्या हंगामातील उचली बद्दलच बोलले. पुढील २०१७-१८ च्या हंगामासाठी ३४०० रूपये प्रथम उचल मागितले. पण यावरसुद्धा ते ठाम नाहीत. यातही तडजोड करायची तयारी दाखवली. कदाचित मागील हंगामाप्रमाणे एफआरपी अधिक दिड-दोनशे रकमेला तयार होतील आणि तडजोड होईल. तसेच झाले तर ३००० रूपये उचलीवर तडजोड होईल. (प्रत्यक्षात नंतर याहीपेक्षा कमी रकमेवर एफआरपी अधिक १०० रू. दरावर तडजोड झाली. तरीही स्पर्धेमुळे कारखानदार त्याहीपेक्षा जास्त ३००० रू. देऊ लागले. शेवटी खुली बाजारपेठ हेच शेतकऱ्यांना लाभदायक आहे.)

परिषदेनंतर सालाबादप्रमाणे साखर कारखानदार आणि शेतकरी नेते यांच्यात कलगीतुरा सुरु झाला. आमचे ट्रॅक्टर फोडले तर तुमचे ट्रॅक्टर जाळू, अशी धमकी श्री. हसन मुश्रीफ यांनी कारखानदारांच्या वतीने दिली. याला स्वाभिमानीच्या नेत्यांनीही प्रत्युत्तर दिले. पाऊस खूप झाला आहे. ऊस तोडणीसाठी रानात ट्रॅक्टर घालता येत नाही तोपर्यंत आव्हान प्रति आव्हानांचे नाट्य सुरु राहील. शेवटी चर्चेने ३००० रूपयाजवळ कोठे तरी तडजोड होईल. या २०१७ च्या हंगामातही सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अंतिम दर ३२०० रूपयांपेक्षा फार जादा मिळेल याची सूतराम शक्यता नाही. आता पुन्हा एकदा उचलीत किंचित वाढ आणि फायनलमध्ये भरघोस कपात होणार हेही स्पष्ट आहे. यातून शेतकऱ्यांचे हित कसे साधेल?

पुढील गाळप हंगामात ३५०० रूपये प्रति क्विंटल सरासरी दराने साखर विक्री झाली तर २०१७-१८ गाळप हंगामातील १२.५ टक्के साखर उतारा असणाऱ्या उसाला गुजरातमधील साखर कारखाने ३८०० रूपये प्रतिटन पेक्षा जादा भाव देतील. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील १२.५ ते १३.५ टक्के साखर उतारा असलेल्या शेतकऱ्यांच्या उसाला मात्र ३००० ते ३२०० पर्यंतच भाव मिळेल. तरीही आमच्यामुळेच शेतकऱ्यांना जादा भाव मिळतो, अशी हलगी वाजवण्यात काय अर्थ आहे?

मागील हंगामात (२०१६-१७) जवाहर साखर कारखान्याने एफआरपीपेक्षा ५७६ रूपये जादा दिले. यापैकी १७५ रूपये आंदोलनामुळे ॲडव्हान्समध्ये एफआरपीपेक्षा जास्त

मिळाले. तरीही कोणतेही आंदोलन न करता नंतर आणखी ४०१ रूपये जादा मिळाले. तेव्हा आंदोलन झाले नसते तरीही १७५ रूपये थोड्या उशिराने का होईना पण मिळाले असते. आंदोलनामुळे जादा दर मिळाला हा भ्रम आहे. कोठे तरी चुकते आहे. केवळ उचलीत शे-दोनशेची वाढ घेऊन आणि अंतिम दरात नुकसान करून शेतकऱ्यांची फसवणूक किती दिवस करणार ?

आता स्वाभिमानी आणि राष्ट्रवादीचे नेते, साखर कारखानदार यांच्यात 'ट्रॅक्टर जाळू' इथपर्यंत आव्हान प्रति आव्हानाची आतषबाजी सुरु आहे. पण हे मनावर घेऊ नका. हसन मुश्रीफ यांनी कांही महिन्यापूर्वीच राजू शेट्टी यांच्या आत्मक्लेश यात्रेला कागलहून थेट मुंबईला रसद पाठवली होती. मा. शरद पवार यांनी तोंडभरून खा. राजू शेट्टी यांचे कौतुक केले होते. खा. राजू शेट्टी यांनीही शरद पवारांची प्रशंसा केली होती. पुढील निवडणुकीत ही सर्व मंडळी एकत्र एकाच स्टेजवर दिसल्यास आश्चर्य वाटू नये.

जवाहरच्या रौप्य महोत्सवी गाळप हंगामाच्या शुभारंभ कार्यक्रमात श्री. शरद पवार म्हणाले, साखर कारखाने सुरु व्हायची वेळ झाली की महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात नेहमी गडबड असते. इचलकरंजी व त्याच्या भोवतीच ही गडबड दिसते. त्यावेळी अनेक लोकांची मोठी मोठी वक्तव्ये आम्ही ऐकतो. त्यातून संघर्ष सुरु होतो. या संघर्षातून तुम्ही एक खासदारही निवडूण दिला. त्या खासदारांनी सातत्याने ही भूमिकाही मांडली. ही भूमिका संघर्षाची आहे, असे आम्हास वाटायचे. पण आता यात कांही तरी गडबड आहे, असे वाटु लागले आहे. (सकाळ, ०३ नोव्हेंबर, २०१७) श्री. शरद पवारांनी अगदी मोजक्या शब्दात वर्मावर बोट ठेवले.

जवाहर साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. प्रकाश आवाडे म्हणाले, यापुढे खा. राजू शेट्टी आणि आवाडे एकत्र असतील. ऊस दराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्पष्ट भूमिका घेण्याची गरज आहे. आता खा. राजू शेट्टी यांना घेरण्याची भूमिका योग्य होणार नाही. यंदाच्या हंगामात केवळ एफआरपीवर शेतकऱ्यांचे समाधान होणार नाही. जवाहर कारखानाच ऊस दराची ऊस दराची कोंडी फोडेल. आंदोलनाचा प्रश्न इतका सहज सुटणार असे दिसताच सहकारमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, सरकार ऊस दराच्या प्रश्नात हस्तक्षेप करणार नाही. आवाडे यांनी सर्व कारखानदारांना एकत्र करून निर्णय घ्यावा. त्याला सरकारचे 'मम' (होय) असेल. थोडक्यात आंदोलनाच्या चक्रव्युहातून बाहेर पडण्यासाठी खा.राजू शेट्टी यांची पळवाट तयार आहे. उचलीत किरकोळ वाढ घेण्यापेक्षा गुजरात पद्धतीने अंतिम दर देत असतील स्वागत आहे. नसेल तर प्रतीवर्षी आंदोलनाच्या चक्रव्युहात जावे कशाला ?

गेल्या वर्षभरातील केंद्र सरकारच्या साखर धोरणावर ऊस परिषदेत बोलण्यासारखे बरेच

होते. पण खा.राजू शेट्टी याबद्दल फारसे बोलले नाहीत. ते म्हणाले, साखर आयात करून शेतकऱ्यांना मातीत घालण्याचे कारस्थान सरकारने केले होते. याला विरोध केल्यावर केवळ ३ लाख टन साखर आयात केली. हे राजू शेट्टींचे विधान सरळ सरळ चुकीचे आहे.

गेल्या वर्षभरात केवळ ३ लाख नव्हे तर ८ लाख टन साखरेची आयात झाली. ही आयात करताना केंद्र सरकारने खूप समंजस निर्णय घेतले. साखरेचे भाव ३५ ते ४० रूपये प्रति किलो पातळीत स्थिर राहतील याची काळजी घेतली. यातून ग्राहक आणि शेतकऱ्यांचे हित साध्य करण्याचा प्रयत्न केला. टंचाईसदृश्य परिस्थितीमुळे अवाजवी पातळीवर भाव जाऊन गोंधळ होऊ नये, याची काळजी सरकारने घेतली आवश्यक तेवढीच साखर आयात केली. प्रथम ५ लाख टन साखर आयात केली. ती साखर मुख्यतः टंचाई असलेल्या दक्षिणेत आणि कलकत्याला होईल याची दक्षता घेतली. हंगामाअखेरीस अल्पकालासाठी साखरेची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून टंचाईग्रस्त भागातच ३ लाख टन साखर आयात केली. त्यामुळे साखरेचे बाजारभाव ३७-४२ दरम्यान स्थिर राहिले. यामुळेच यंदाही उसाला चांगला भाव मिळणार आहे. कारखान्यातील साखर साठ्याबाबतीतसुद्धा सरकारने असाच निर्णय घेतला. हे करताना इस्मा, सहकारी साखर संघ इत्यादींना विश्वासात घेतले. साखर कारखान्यांनी आणि व्यापाऱ्यांनी साठेबाजी करून अचानक भाववाढ करू नये याची काळजी सरकारने घेतली. अशा सावध साखर आयात धोरणाचे स्वागत करणे योग्य होईल.

२००९-१० आणि २०१०-११ मध्ये अशीच टंचाईची परिस्थिती निर्माण झाली होती. साखर दर वाढीवर ओरड सुरु झाल्यावर केंद्र सरकारने घाईघाईत ३७.५ लाख टन साखर आयात केली. साखरेची आयात भरमसाठ किंमतीत झाली. नंतरच्या दोन वर्षात देशातच साखरेचे प्रचंड उत्पादन झाले. साखरेचे पडणारे दर सावरण्यासाठी २०११ ते १३ मध्ये अनुदान देऊन कमी किंमतीत ४४ लाख टन साखर निर्यात करावी लागली. साखर आयातीत नुकसान आणि साखर निर्यातीत नुकसान, अशी विचित्र अवस्था झाली. शेवटी यात शेतकऱ्यांचे आणि देशाचेही नुकसान झाले. त्यावेळी कृषिमंत्री श्री. शरद पवार होते. सरकार काँग्रेसचे होते. यावर्षी ती चूक सध्याच्या सरकारने केली नाही. याचे कौतुक करण्याचा दिलदारपणाही शेतकरी संघटनेने दाखवला पाहिजे. भाजप सरकारने अन्य शेतीविषयक निर्णयामध्ये असंख्य आणि अक्षम्य चुका केल्या आहेत. उदाहरणार्थ, खाद्यतेल आणि डाळींचे आयात, जीएम तंत्रज्ञानावर बंदी, गोहत्याबंदी इत्यादी. त्यावर जरूर कठोर टीका केली पाहिजे. पण चांगल्या धोरणाचे कौतुकही केले पाहिजे.

खा. राजू शेट्टी यांनी स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींचा मुद्दाही प्रतिष्ठेचा केला आहे. स्वामिनाथन आयोगाचा पाचवा आणि अंतिम अहवाल ४ ऑक्टोबर २००६ रोजी सादर झाला. त्यावेळी कृषी आणि अन्नमंत्री श्री. शरद पवार होते. स्वामिनाथन यांच्या

शिफारशी अव्यवहार्य असल्याने त्याची अंमलबजावणी करणे अशक्य असल्याचे भान कृषिमंत्री श्री. शरद पवार आणि अर्थतज्ञ पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांना होते. म्हणून नंतर १२ वर्षाच्या कार्यकाळात स्वामिनाथन अहवालाची अंमलबजावणी झाली नाही.

खुद्द शरद जोशी यांच्या तोंडून ऐकलेला किस्सा असा. एकदा कृषिमंत्री श्री. शरद पवार यांनी शरद जोशींना विचारले, स्वामिनाथन अहवालाचे काय करायचे? तेव्हा चटकण शरद जोशींनी दिलेले उत्तर असे, जवळच्या कचरा पेटीत टाकून द्या. वास्तविक श्री. शरद पवार आणि श्री. मनमोहन सिंग यांना अडचणीत आणण्यासाठी स्वामिनाथन शिफारशीचा आग्रह करू शकले असते. अशक्यप्राय मागणी करून सरकारला अडचणीत आणायचे नाही हा शरद जोशींचा निर्णय. शेतकरी नेता म्हणून शरद जोशी यांनी एकदाही अवास्तव मागणी केली नाही. सरकार शेतकऱ्यांच्या अवास्तव मागण्या पुरवू शकत नाही, याचे त्यांना भान होते.

या उलट श्री. नरेंद्र मोदी यांचे वर्तन होते. २०१४ मध्ये लोकसभा निवडणूकीत सांगली येथील प्रचार सभेत राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत श्री. नरेंद्र मोदींनी घोषणा केली. शेतकऱ्यांना उत्पादन खर्च अधिक ५० टक्के इतका भाव देऊ. त्यावेळी या आश्वासनाबद्दल दै. लोकमतसाठी लेख देण्याची विनंती लोकमतचे संपादक श्री. विजय कुवळेकर यांनी केली. त्यानंतर लगेच लोकमतमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखात, शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के देणे अशक्य असल्याचे मी मांडले होते. सत्तेत आलेनंतर हे आश्वासन पूर्ण करावे या मागणीसाठी काही लोक उच्च न्यायालयात गेले. हे आश्वासन पुर्ण करता येत नाही याची कबुली उच्च न्यायालयात मोदींना द्यावी लागली. तेव्हा निवडणुकीत खोटे आश्वासन देऊन श्री. नरेंद्र मोदींनी शेतकऱ्यांना फसविले. आता राजू शेट्टी शेतकऱ्यांना फसवू पहाताहेत. एवढाच फरक.

तेव्हा गणदेवी पद्धतीने ऊस दर दिला जावा असे ऊस दराबाबत एवढेच म्हणता येईल. मग प्रथम उचल कमी असेल. मात्र अंतिम दर सर्वात जास्त असेल. असे करणे सहज सोपे नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा साखर कारखानदारांवर विश्वास नाही. जे मिळेल ते आधीच घ्यावे, असे त्यांना वाटते. यासाठी महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करावा लागेल. असा बदल करण्याची मानसिकता महाराष्ट्रातील साखर उद्योगात आहे का, हा खरा प्रश्न आहे. असा बदल घडवून आणण्यासाठी शेतकरी आंदोलनाने साखर उद्योग आणि सरकारला भाग पाडले पाहिजे. शेतकरी आंदोलनाचा उपयोग करून राजकीय लाभ मिळविण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या शोषणाची व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सध्याच्या शेतकरी आंदोलनातून हे घडत नाही.

म्हणूनच गुजरातचा ऊस दर अतिशय चर्चेचा विषय झाला तरी राजू शेट्टी यांनी याबद्दल

चकार शब्द काढत नाहीत. तेव्हा पुन्हा एकदा सालबादाप्रमाणे आंदोलन आणि तडजोड होत राहील. उचलीत दोन पैसे जास्त मिळाल्याचे समाधान शेतकऱ्यांना मिळेल. पण एकूण अंतिम दर कमीच असेल. अशा आभासी यशातून शेतकऱ्यांना फायदा कसा होईल? (दिनांक: ०३.११.२०१७)

**टिप:** माझ्या लेखातील सर्व भाकिते नंतर खरी झाली हे सांगण्यात मला खेद वाटतो. अपेक्षेप्रमाणे खा.राजू शेट्टी यांनी २०१७-१८ हंगामात सांगली-कोल्हापूर जिल्ह्यात एफआरपी अधिक १०० रू. उचलीसाठी तडजोड केली. अंतीम दराबद्दल ते बोलत नाहीत. गुजरातमधील दराबद्दल बोलत नाहीत. कमी उचलीचा करार झाला तरी स्पर्धेमुळे साखर कारखानदार २०० ते ४०० रू. जादा देत आहेत. मग आंदोलनाने काय साध्य केले ?

- श्री. अजित नरदे, (दि. २८/११/२०१७)

**The draft of Indian Marshall Plan for**

# Bharat's Integral Reconstruction and Development (BIRD)

Any Marshall Plan essentially involves a reversal of the post-war roles of the Vanquisher and the Vanquished. At the outset Bharat shows white flag indicating that it is the vanquished nation in the conflict with India. Bharat found no adequate response to the horrendous weapon of Global warming that India used against Bharat causing cloud burst, untimely rains, hail storms, frequent droughts which devastated the agricultural economy - the backbone of Bharat's economic structure.

**Modalities of Marshall Plan execution.**

1. The Government of India undertakes to issue special bonds of the amount, at least of Rs. 300 thousand crores which corresponds to the estimate made in the report of the Task Force on Agriculture (2000-2001) about the losses suffered by the farmers in the 20 years from 1981 to 2000 on account of the negative subsidy policies imposed by the government of India. The proceeds of the bonds as also the proceeds of the sales and purchases of agricultural land will constitute the main bulwark of the Marshall Plan activities.

2. Total waiver of agricultural loans including electricity bills of all farmers, removing all restrictions on domestic as also international trade of agricultural commodities, removing all restrictions on trials and use of technological innovations.

3. The Marshall Plan can be taken advantage of by any state in the Union that is prepared to cooperate with the objectives of the Marshall Plan in an adequate measure as judged by the proportion utilized of the total outlay of sales and purchases of agricultural land in the state for purposes of infra-structural growth, particularly cold storage facilities, construction of adequate roads between farm-gates and the market places as also the quantum of cold transport facilities. The states which are not found to be cooperating with the objective of the Marshall Plan may run the risk of being kept out of the implementation of the Marshal Plan for appropriate periods.

In all the social, economic or strategic warfare the vanquisher country has invariably imposed its will on the vanquished nations and taken away their valuable assets including financial resources or rich mining lands etc. The one way transfer of this type was known to be impossible of implementation. As happened in the case of India and Bharat, Bharat stands vanquished. But rather than impose further taxation on Bharat it is the turn of India now to make moves that will permit Bharat to become an active participant in all Commerce with India, if necessary in competition with the Indian players.

Two examples are particularly relevant here.

France as a consequence of Versailles treaty not only imposed heavy reparation payments on Germany but also took away major mining provinces like Ruhr. This kind of a one way exploitation could not continue for long time and essentially resulted in hyper-inflation, the rise of Hitler and the second World War.

Quite contrary is the story of Japan which, even after the nuclear holocaust stands once again as a proud and prosperous nation. The secret of Japan’s accomplishment lies in the fact that, right since 1921 Japan followed a policy of keeping the paddy prices mush higher than the international prices. This was again contrary to the Indian policy of negative subsidies to farmers of Bharat i. e. fixing prices of farm produce that would be much lower than the international market prices.

In order to avoid further conflicts between two friendly nations like India and Bharat the Marshall Plan proposes to restructure the vanquished Bharat in such a way that it once again stands on its own feet and take part as equal partners with the Indian economy.

**Sharad Joshi,** Pune: 05 October 2015

## स्मारक : एका लढवय्याचे



योध्दा शेतकरी शरद जोशी यांचे नाव
स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शेतकरी
चळवळीचे व असंतोषाचे क्रियाशील
जनक म्हणून इतिहासात कोरले गेले आहे.
त्यांची शेती-अर्थव्यवस्थेची आणि भारत-इंडिया द्वैताची
मांडणी १९८० पासून तीन दशके भारतभर गाजली.
१९९२ पर्यंत रास्त-भावाची चळवळ आणि त्यानंतर
खुल्या बाजारपेठेचे प्रतिपादन हे त्यांच्या कार्याचे दोन प्रमुख अध्याय आहेत.
मा. शरद जोशी २००० मध्ये केंद्रीय कृषी कार्यबलाचे अध्यक्ष होते,
आणि २००४ पासून सहा वर्षेराज्यसभेचे सदस्य होते.
याचबरोबर भारतीय लिबरल म्हणजे उदारमतवादी अर्थवादाचा
पुरस्कर्ता म्हणूनही त्यांचे स्थान निर्विवाद आहे.
यासाठी त्यांनी स्वतंत्र भारत या राजकीय पक्षाची स्थापना केली.
आज भारताला उदारमतवादी-स्वातंत्र्यवादी अर्थ-राजकारणाची
नितांत गरज आहे. म्हणूनच पुणे जिल्ह्यात आंबेठाण ह्या
त्यांच्या अंगारमळा या कर्मभूमीत एक प्रेरणादायी
स्मारक करण्याचा संकल्प न्यासाने केलेला आहे.
त्यांनी न्यासाला दिलेल्या भूमीवर एकूण स्मारकाचा आराखडा तयार होत आहे.
याचा एक भाग म्हणून शरद जोशी अभ्यास केंद्र सुरू होत आहे.
याच सर्व कामासाठी मोठी आर्थिक गरज असून आपण सढळपणे चेक किंवा
RT/NEFT ने निधी द्यावा, अशी विनंती न्यासातर्फे करीत आहोत.

- नावे : शेतकरी संघटना न्यास
- बचत खाते बँक अकांऊट क्रं- 503801011003483
- विजया बँक, खडकी, पुणे शाखा IFSC-VIJB00005038
- शेतकरी संघटना न्यासास मिळणाऱ्या देणग्या ८० जी सवलतीस पात्र आहेत.
- 80G Exemption No. PN/CIT/(Exempt)
Tech/80G/655/2016-17/7194 Valid from 12/01/2017

शेतकरी संघटना

- देणगी मूल्य रू. १०/-